# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्र. १६०-२३** **दिनांक :- १९/०५/२०२३**

## मोबाईल सह मोटार सायकल जबरीने चोरी करण्या-या अरोपीतांस अटक करुन मुद्देमाल हस्तगत- गुन्हे शाखा कक्ष-२, वसई यांची कामगिरी.

नायगाव पोलीस ठाणेचे हद्दीत दिनांक १२/०५/२०२३ रोजी रात्रौ ००.१५ ते ००.३० वाजेच्या दरम्यान मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील चिंचोटी ब्रिज जवळ, जैन मंदिराच्या गेट पासून पुढे मोकळ्या जागेत गुन्हयातील फिर्यादी राजमंगल संतलाल सिंग, रा. आई चंडीका चाळ, रुम नं. ०९, सोमेश्वर नगर ता. वसई, जि. पालघर हे रस्त्याच्याकडेला त्यांच्या ताब्यातील काळ्या रंगाची हिरो होंन्डा शाईन मो.सा. क्रमांक एम. एच. ४८ सी.डी. ९३७४ ही पार्क करुन रोडलगत उभे असताना दोन अनोळखी ईसमांनी फिर्यादी यांचे पाठीमागुन येवून फिर्यादी यांना घट्ट पकडून ठेवून त्यांच्या ताब्यातील दोन व्ही.वो. कंपनीचे मोबाईल फोन, २,०००/-रुपये रोख रक्कम आणि फिर्यादी यांची वर नमुद वर्णनाची हिरो होंन्डा शाईन गाडी ही जबरीने चोरी करुन पळुन गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.नं. ९३/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ अन्वये दिनांक १२/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हा दाखल झाल्याची माहिती प्राप्त होताच गुन्हे शाखा कक्ष २, वसई युनिटचे अधिकारी व अंमलदार हे तात्काळ वरिष्ठांचे आदेशाने सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील प्राप्त सी. सी. टी. व्ही. कॅमेरांचे फुटेजचे अवलोकन करुन चोरटयांचा पळुन जाण्याचा मार्गाचा शोध घेतला व चोरीस गेलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे अधारे अरोपीत नामे अभिषेक दिलीप त्रिपाठी, रा. वैजनाथ जाधव चाळ, प्रताप नगर, जोगेश्वरी पुर्व, सध्या रा. संतोष भवन, नालासोपार पुर्व, २) जाफर उर्फ सलमान अमीर अली खान, रा. केजीएन बिल्डींग, दौलत नगर, कौसा मुंब्रा ता.जि. ठाणे सध्या रा. संतोष भवन, नालासोपार पुर्व यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १८/०५/२०२३ रोजी झैनबिया, मुंब्रा, ता. जिल्हा ठाणे येथुन ताब्यात घेण्यात आले.

सदर गुन्हयातील आरोपीत याचे अंगझडतीत फिर्यादी यांचे जबरीने चोरलेले व्ही.वो. कंपनीचे दोन मोबाईल फोन आणि फिर्यादी यांची वर नमुद वर्णनाची हिरो होंन्डा शाईन मोटार सायकल असा एकुण ६६,०००/- रुपये किंमती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २ वसई युनीटचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.



---------○○○--------